31NU

**सामाजिक विकास कक्ष**
**दिनांक: ११ जून, २०२६**

विषय : बांद्रा-कुर्ला संकुल येथील बी.केसी.-सि.एस.टी. फॅनिंग प्रकल्पातील बाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन कुर्ला प्रिमिअर येथील इमारत क्र. ३० व १७ येथील वसाहतीमध्ये करणेबाबत.

संदर्भ: श्रीमती मानसी चंद्रकांत कनाल व इतर १५ प्रकल्पग्रस्तांची मा. प्रमुख, सा.वि.कक्ष यांना सादर केलेले दि. १६/०६/२०२५, दि. १९/०६/२०२५ व दि. ३०/०७/२०२५ रोजींचे अर्ज.

कृपया उपरोक्त नमूद विषयाचे व संदर्भाचे अवलोकन होण्यास विनंती.

बांद्रा-कुर्ला संकुल येथील बी.केसी.-सि.एस.टी. फॅनिंग प्रकल्पातील प्रकल्पबाधितांचे पुनर्वसनासाठी १५ निवासी सदनिकांची मागणी व ०१ अनिवसी सदनिकेची मागणी वितरण शाखेकडे करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्प हा वाहतुक कोंडी सुधारण्याकरीता वाहतूकीत अडथळा निर्माण होणाऱ्या अमिक्रमण धारकांची निष्कासन करुन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत मा. महानगर आयुक्त यांनी सुचना दिल्या होत्या. सि.एस.टी. रोड जंक्शन पासनू बांद्रा-कुर्ला संकुलातील वाहतूकीस अडथळा निर्माण करणाऱ्या अतिक्रमित जागेवरील निवासी, अनिवासी उपहार गृहे, फर्निचर दुकाने इ. व इतर बांधकामे प्रकल्पात बाधित झालेली होती. टिपण्णीत नमूद केल्याप्रमाणे एकूण १२७ बांधकामे बाधित होत होती. त्यापैकी ८३ प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात आलेले आहे. ४४ प्रकल्पग्रसतांचे पुनर्वसन प्रलंबित आहे. सदर पुनर्वसन करताना १६ प्रकल्पग्रस्त असे आहेत कि, ज्यांनी पुनर्वसनाची मागणी या कार्यालयाकडे दिलेली आहे. उपरोक्त मागणी केलेल्या प्रस्तावातील १३ अनिवासी बांधकामे व ०३ निवासी बांधकामे आहेत यातील १३ अनिवासी बांधकामापैकी केवळ ०१ प्रकल्पबाधिताने अनिवासी गाळ्याची मागणी केलेली आहे. १२ अनिवासी गाळेधारक असे आहेत कि, ज्यांनी निवासी सदनिकेची मागणी केलेली आहे. एकूण मागणी १५ निवासी व ०१ अनिवासी अशी आहे. त्यानुसार वितरण अधिकाऱ्यांनी १६ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन (१५निवासी व ०१ अनिवासी) सदनिकेची मागणी केलेली आहे.

कुर्ला परिसरात भंडारी मेटलर्जीस येथे इमारत क्र. ०४ लवकरच उपलब्ध होणार असून याबाबत भूमी शाखेमार्फत सदनिकांची तपासणी करण्यात आलेली आहे. सदर इमारतीत १७० सदनिका उपलब्ध असून सदर सदनिकांपैकी ए विंग मध्ये एकूण ८५ सदनिका उपलब्ध असून यापैकी ७१ सदनिका वरळी-शिवडी प्रकल्पातील प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी मा. महानगर आयुक्त यांच्याकडे आरक्षित ठेवण्याठी प्रस्तावित केलेले आहे. याच इमारतीतील १४ सदनिका व ०१ सदनिका बी-विंग मधील असे एकूण १५ निवासी व एच.डी.आय.एल. कुर्ला प्रिमिअर येथे इमारत क्र. ०१ मध्ये उपलब्ध होणाऱ्या अनिवासी गाळ्यामध्ये पुनर्वसन करण्यासाठी सदनिका आरक्षणासाठी बांद्रा-कुर्ला संकुल येथील बी.केसी.-सि.एस.टी. फॅनिंग प्रकल्पातील प्रकल्पासाठी आरक्षित ठेवण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आहे. १५ निवासी सदनिकांचा तपशिल खालीलप्रमाणे :

| अ. क्र. | प्रकल्पबाधिताचे नाव | इमारत क्र. | माळा | विंग | सदनिका क्र. | एकूण सदनिका |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मानसी चंद्रकांत कनाल | ०४ | तळमजला | ए | जी-२ | ०१ |
| २ | मोहम्मद अरिफ इरशाद अहमद | ०४ | तळमजला | ए | जी-४ | ०१ |



Scanned with OKEN Scanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | शाहिदा शादाब अहमद खान | ०१ एच.डी.आय.एल.कुर्ला प्रिमिअर येथे उपलब होणाऱ्या अनिवासी गाळ्यामध्ये | - | - | - | - |
| ४ | डोमासिआर पिटर डिसुझा | ०४ | तळमजला | ए | जी-५ | ०१ |
| ५ | विशाल भवरलाल शर्मा | ०४ | ११ | ए | ११०४ | ०१ |
| ६ | सुरेंद्र पांडे | ०४ | ११ | ए | ११०५ | ०१ |
| ७ | पल्लवी दिपक पाटील | ०४ | ११ | ए | ११०६ | ०१ |
| ८ | मोहम्मद जावेद कलानिया | ०४ | ११ | ए | ११०७ | ०१ |
| ९ | नवैदा मोहम्मद अरिफ झवेरी | ०४ | १२ | ए | १२०१ | ०१ |
| १० | रुक्साना नवाब अहमुद्दीन शेख | ०४ | १२ | ए | १२०२ | ०१ |
| ११ | साहिस्ता फैज खान | ०४ | १२ | ए | १२०३ | ०१ |
| १२ | मल्लका बेगम मोह. हनिफ शेख | ०४ | १२ | ए | १२०४ | ०१ |
| १३ | शबाना इम्रान काझी | ०४ | १२ | ए | १२०५ | ०१ |
| १४ | मोहम्मद अबीद मोह. सलीम खान | ०४ | १२ | ए | १२०६ | ०१ |
| १५ | तेजस्वी राजेश साळवी | ०४ | १२ | ए | १२०७ | ०१ |
| १६ | मोहसीन फारुख कलानिया | ०४ | १ | बी | १०१ | ०१ |
| | एकूण | | | | | १६ |

उपरोक्त प्रमाणे एकूण १५ निवासी व ०१ अनिवासी अशी वितरणसाठी आरक्षित करण्साबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. कृपया बांद्रा-कुर्ला संकुल येथील बी.केसी.-सि.एस.टी. फॅनिंग प्रकल्पातील बाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी एच.डी.आय.एल. कुर्ला प्रिमिअर येथे उपलब्ध होणाऱ्या इमारत क्र. ०१ मधील अनिवसी गाळा व भंडारी मेटालर्जीस येथे इमारत क्र. ०४ मध्ये ए विंग मधील १४ व बी विंग ०१ अशा १५ अनिवासी सदनिका आरक्षित ठेवण्याबाबत मान्यता मिळण्यास विनंती आहे.

प्रस्ताव आदरपूर्वक मान्यतेस्तव सादर.

11/06/2026

सहा. स.वि.अ. (श्री. जाधव)

समाज विकास अधिकारी (श्री. जोशी) 11-6-2026

उपजिल्हाधिकारी (श्री. शिंदे) 11/06

PAP Software मध्ये नोंदी घेणेत आयेले आहे, तरी मान्यतेस्तव विनंती.

मा. प्रमुख सामाजिक विकास कक्ष 15/06/2026.

मा. अतिरिक्त महानगर आयुक्त-१ 14/07/26

Addl. MC (I) & PD's Office
No: 850
Date: 14/07/2026